# टिमी आणि पिल्लू



माधव चव्हाण

Original Story (*English*) Timmy and Pepe
by Madhav Chavan and Manisha Vengurlekar
© Pratham Books 2004
Second Marathi Edition: 2010

Illustrations: Santosh Pujari
Marathi Translation: Meera Tendolkar

ISBN: 81-8263-027-4

Registered Office:
PRATHAM BOOKS
633-634, 4th 'C' Main, 6th 'B' Cross,
OMBR Layout, Banaswadi, Bangalore 560 043
✆ +91 80 25420925

Regional Office:
New Delhi ✆ +91 11 41042483

Typesetting and Layout by: Pratham Books, New Delhi

Printed by: Printo Tech, New Delhi

Published by:
Pratham Books
www.prathambooks.org

The development of this book was sponsored by
Dubai Creek Round Table, Dubai, U.A.E.



Some rights reserved. This book is CC-BY-3.0 licensed.
Full terms of use and attribution available at:
http://www.prathambooks.org/cc

# टिमी आणि पिल्लू

लेखक
माधव चव्हाण
संकल्पना
मनिषा वेंगुर्लेकर
चित्रांकन
संतोष पुजारी
मराठी रुपांतर
मीरा तेंडोलकर



मी आहे टिमी.



हा आहे माझा मित्र पिल्लू.

पिल्लूला चिडवायला मला खूप आवडते.

मी त्याला सांगते, ''मी तुझ्यापेक्षा चांगली आहे.''



पिल्लूला ते मुळीच आवडत नाही.

मी म्हणते, ‘‘हे बघ माझे नाक.’’

‘‘भू !’’ पिल्लू म्हणतो.





याचा अर्थ त्यालाही एक नाक आहे.

मी म्हणते, ''हे बघ माझे कान.''

''भू !'' पिल्लू म्हणतो.





याचा अर्थ त्यालाही कान आहेत.

मी म्हणते, ''मला बघ डोळे आहेत.''

''भू !'' पिल्लू म्हणतो.



याचा अर्थ त्यालाही डोळे आहेत.

मी म्हणते, ''मला बघ पायांनी नाचता येते.''

''भू, भू, भू, भू !'' पिल्लू म्हणतो.



याचा अर्थ त्यालापण पाय आहेत.

मी म्हणते, ''मला बघ जीभ आहे.''


''भू !'' पिल्लू म्हणतो.



याचा अर्थ त्यालाही जीभ आहे.

मी म्हणते, ''मी विचार करु  शकते.''

''भू ऽ ऽ ऽ ऽ ऽ !'' पिल्लू म्हणतो.



याचा अर्थ त्याला जास्त चांगला विचार करता येतो.

मी म्हणते, ''मला बघ हात आहेत.''

''गु र्ऽ ऽ ऽ ऽ !'' पिल्लू म्हणतो आणि वळून शेपटी हलवू लागतो.



याचा अर्थ त्याला शेपटी आहे आणि मला नाही.



पण मला पिल्लू खूप खूप आवडतो.

त्यालासुद्धा मी खूप खूप आवडते.



डोळे



नाक



जीभ



कान



पाय



हात



मी विनित. मला घरे आणि पुलांचे आलेख बनवायचे आहेत. मी एक ब्रेकडान्सरसुद्धा आहे आणि त्यात मला अनेक पारितोषिके मिळाली आहेत. तुम्ही हे पुस्तक विकत घेतल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. यामुळे माझ्या वाचनालयाला माझ्यासाठी आणि माझ्या मित्रमैत्रिणींसाठी नवीन पुस्तके घेता येतील.

**माधव चव्हाण** आणि त्यांचे काही मित्र, यांनी प्राथमिक शिक्षणावर भर देणारी 'प्रथम' नावाची स्वयंसेवी संस्था १९९४ मध्ये सुरू केली. मुलांचं शिक्षण हा त्यांचा आत्यंतिक जिव्हाळ्याचा विषय. लेखन, गायन यात त्यांना रुची असून ते उत्तम छायाचित्रकार आहेत.

**संतोष पुजारी** यांना मुलांच्या पुस्तकासाठी चित्रं काढायला आवडतात. प्रथम या स्वयंसेवी संस्थेत त्यांनी काम केले आहे.

मूल प्राण्याशी खेळते तेव्हा तो प्राणीही काही प्रतिसाद देतो. मग ते मूल त्याच्यातून आपल्यापरीने अर्थ काढते. कुत्रा किंवा मांजर लाडाने पाय पुढे करते व मग तो शेकहँड आहे असे मुलाला वाटते. **टिमी आणि पिल्लू** यातील टिमी असाच अर्थ काढते आहे काय ?

आमच्या वेगवेगळ्या भाषांतील शीर्षकांच्या माहितीसाठी
**www.prathambooks.org** ला लॉग ऑन करा

आमची पुस्तके इंग्रजी, हिंदी, मराठी, कानडी, गुजराथी, बंगाली, तामिळ, तेलुगु, पंजाबी, उर्दू आणि उडिया या भाषांमध्ये मिळतात.

**PRATHAM BOOKS**

**प्रथम बुक्स** ही ना-नफा तत्वावर चालणारी संस्था असून, अनेक भारतीय भाषांमध्ये, लहान मुलांसाठी उत्तम दर्जाची पुस्तके परवडतील अशा किंमतीत प्रसिद्ध करते.

ISBN 81-8263-027-4
9 788182 630277

Age Group: 3-6 years
Timmy Aani Pillu (Marathi)
MRP: Rs. 15.00